१३/०१/२०२५

शपथेवर उर्वरित सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री. बी.डी.काळे, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत

०५. मला ज्या काठीने माहरणाण झाली ती मला दाखविलयास मी ओळखू शकतो. आता साक्षीदारास जप्त मुद्देमाल एक काठी दाखविण्यात आली. ती तीच असल्याचे साक्षीदार सांगतात. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. ते आज न्यायालयात हजर आहेत.

उलटतपास आरोपीतर्फे – श्री.व्ही.पी. देशमुख, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु

०६. हे म्हणणे खरे आहे की, मला सख्खे तीन भाउ आहेत. त्यापैकी एक मयत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मयत भावाच्या पत्नी आमच्याकडे राहतात आणि त्यांचे पालनपोषण मी करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मयत भावाला एक मयत मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेपूर्वी त्या मुलीचे लग्न झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाचे सर्व मीच पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुतणीच्या लग्न प्रक्रीयेमध्ये आरोपीचा सहभाग नव्हता.

प्रश्न – तुम्ही आरोपीला लग्नासाठी बोलाविले नसताना ते लग्नामध्ये आले होते ?

उत्तर – लग्न माझ्या पुतणीचे होते, मी आरोपीला आमंत्रण देण्याचा प्रश्न नाही. वहिणीने आमंत्रण दिले असे मला माहिती नाही. आरोपी लग्नात आला होता किंवा नाही ही मी पाहिले नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुतणीच्या लग्नाच्या अगोदर माझे आणि आरोपीमध्ये बोलचाल आणि व्यवहार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे मुंबई येथे सोन्या–चांदीचे दुकान होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अगोदर आरोपीचे मुंबई येथे सोन्या–चांदीचे दुकान होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकानाचे बस्थान आरोपीने बसवून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकानाची जडण–घडण

आणि आर्थिक प्रगतीमध्ये आरोपीचा मोठा सहभाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मुद्दामहून आरोपीचा सहभाग नाकारत आहे.

०८. हे म्हणणे खरे आहे की, चिंचाळे येथील गट क्र. ५१९ ही आम्ही चार भावांची मिळून खरेदीची जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, चिंचाळे गावामध्ये सत्तर ते ऐंशी लोकवस्ती आहे, ती चोपडे वस्ती म्हणून ओळखली जाते. हे म्हणणे खरे आहे की, चोपडे वस्ती चिंचाळेपासून दक्षिण बाजूला एक किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, चोपडे वस्तीपासून गट क्र. ५१९ हे अंतर अंदाजे दोन किलोमीटर असावे. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि माझे भाउ असे चोपडे वस्ती येथे राहण्यास आहोत. हे म्हणणे खरे आहे की, भाउ म्हणजे ज्ञानेश्वर होय. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५१९ हा डोंगर कपा–यामध्ये लांब अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५१९ च्या पाचशे ते सहाशे मीटर अंतरापर्यंत राहती लोकवस्ती नाही. हे म्हणणे खरे आहे की, चोपडे वस्ती ते गट क्र. ५१९ च्या दरम्यान तुरळक लोकांची पिक–पाणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमची शेती आम्ही गडयांमार्फत करतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी त्याची शेती गडी लावून करतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी माझ्या शेतामध्ये मी माझा गडी ठेवला होता. मी ठेवलेला गडी हा दहा ते पंधरा दिवसांकरीता तात्पुरता आला होता. हे मला सांगता येणार नाही की, त्यावेळी माझा गडी त्याच्या कुटुंबासोबत आला होता किंवा कसे. हे मला माहिती नाही की, त्यावेळी माझ्या गडयाकडे मोबाईल नंबर होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, तो सालगडी होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेपूर्वी दोन वर्षांपासून माझ्याकडे एक गडी होता व तो त्याच्या कुटुंबासोबत राहत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी कधीतरी शेतात जायचो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मुंबईला असल्यामुळे कधीतरी त्यांचे शेतात येत–जात होते.

०९. हे म्हणणे खरे आहे की, माझी जमीन पश्चिमेला आहे आणि आरोपीची जमीन पूर्वेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या शेताच्या पूर्वेला चिंचळे ते खरसुंडी मुख्य रस्त्यापासून दक्षिणेला जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दक्षिणेकडील रस्ता आमच्या वस्तीपासून पुढे जातो. हे म्हणणे खरे आहे की, याच

रस्त्याला माझे आणि आरोपीचे वेगवेगळे शेड आहे. हे म्हणणे खरे आहे की, या रस्त्यालगत आरोपीचे चार ते साडे चार एकर बागायत क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमिनीच्या पश्चिमेला माझी पिक न येणार जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने त्याच्या बागायत क्षेत्रामध्ये मक्याचे पीक काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मका काढून त्याठिकाणी गव्हाचे पीक लावले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने त्याची मक्याची कणसे विकास चोपडे याच्या रानात नेउन टाकली होती. हे मला सांगता येणार नाही की, ती मक्याची कणसे दिड ते दोन महिने विकास चोपडे याच्या शेतात पडून होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, कणसे पडून होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आणि आरोपीच्या सरबांधासमोर विकास चोपडेच्या मोकळया जागेमध्ये ती कणसे पडून होती. हे मला सांगता येणार नाही की, ती कणसे विकास चोपडे याच्या संमतीने त्याच्या शेतात पडून होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला ती कणसे विकास चोपडेच्या रानात टाकल्याशिवाय पर्याय नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अडेल स्वभावामुळे ती कणसे विनाकारण विकासच्या शेतात पडून होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अशा अडमुठे वागण्यामुळे आरोपीचे पाच ते सहा कणसांच्या पोत्यांचे नुकसान झाले होते.

१०. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ५१९ चा भाग खडकाळ जमिनीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी त्याठिकाणी मोठी दगडे होती.

११. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०१/११/२०१९ रोजी मी मळयात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेतातील झाडाची फांदी तुटलेली होती, ही बाब गंभीर आहे असे मला वाटले होते. मला सदर बाबीवरुन तक्रार करावी असे वाटले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ०१/११/२०१९ रोजीच्या तारखेबाबत मी कोठेही तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१/११/२०१९ रोजी माझ्या शेतातील झाडाची फांदी तुटली असे मी बोगस आणि काल्पनिक कारण सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेतातील फांदी तुटली होती हे माझे बोगस आणि काल्पनिक कारण असल्यामुळे मी त्या दिवशी तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.

०४/११/२०१९ ची घटना खरी वाटावी म्हणून मी ०१/११/२०१९ रोजी खोटे व काल्पनिक कारण दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या शेडपासून माझ्या शेतजमिनीचे अंतर बारा फुट होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आणि आरोपीच्या जमिनीच्या सरबांधावरुन रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या सरबांधावरील रुंदी काही ठिकाणी आठ, बारा व दहा फुट अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेतातील झाडे आणि आरोपीच्या शेतातील पाठभिंत यामध्ये काही अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर अंतर विकास चोपडेच्या शेतापर्यंत जाते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेतातील झाडे आणि आरोपीचे शेतातील शेडची पाठभिंत यामध्ये असलेल्या अंतरामध्ये माझे पिक नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे नारळाची झाडे दोन ते तीन फुटाची होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला कणसे नेता येवू नये म्हणून मी खोडसाळपणाने त्या जागेमध्ये दगडे आणून टाकली होती.

१२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे दोन गडी मळणी यंत्र नेण्याकरीता म्हणून दगडाची सारवासारव करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी त्याच्या पूर्वेकडील भागामध्ये गव्हाच्या पिकाला पाणी देत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी अचानक काठी घेवून त्या दोन गडयांना मारण्यासाठी धावून गेलो. हे म्हणणे खरे नाही की, मी धावत असताना दगडावर पडलो आणि माझ्या नडगीला व इतर ठिकाणी जखमा झाल्या.

१३. विलास नाना शिंदे हे माझ्या माहितीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, विलास नाना शिंदे यांच्याशी संपर्क करुन मी खरसुंडी येथे गेलो. हे म्हणणे खरे आहे की, खरसुंडी येथे आउटपोस्ट आणि सरकारी दवाखाना आहे. असे घडले नाही की, मी खरसुंडी आउटपोस्टला गेल्यानंतर पोलीसांनी माझी तक्रार लिहून घेतली नाही. साक्षीदार सांगतात की, मी पोलीसांनी आधी दवाखान्यात पाठविले. असे घडले की, मला झालेल्या जखमा मी खरसुंडी आउटपोस्टला दाखविल्या होत्या. हे मला सांगता येणार नाही की, मला रक्ताच्या जखमा झाल्या होत्या किंवा कसे. असे मला पोलीस म्हणाले नाहीत की, या जखमेवरुन दखलपात्र गुन्हा दाखल होत नाही. माझ्याकडे

त्यावेळी गाडी नव्हती. असे घडले की, खरसुंडी आउटपोस्ट येथे मी पोलीसांना म्हणालो माझी तक्रार घ्या. असे म्हणणे बरोबर होणार नाही की, खरसुंडी आउटपोस्टला माझ्या म्हणण्याप्रमाणे माझी तक्रार लिहून घेतली. हे म्हणणे खरे नाही की, माझी खोटी तक्रार होती म्हणून खरसुंडी आउटपोस्ट येथे माझी तक्रार लिहून घेतली नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यादिवशी आटपाडीपर्यंत कसा आलो हे मला सांगता येणार नाही. मला सरकारी दवाखान्यापर्यंत येण्यास तास ते दिड तास गेला असावा. दवाखान्यात माझ्यासोबत कोणीही नव्हते. मी दवाखान्यात गेलयानंतर डॉक्टरांनी मला वीस ते पंचवीस मिनीटांत तपासण्यासाठी घेतले. मला डॉक्टरांनी पंधरा ते वीस मिनीटे तपासले. झालेल्या सर्व जखमा मी डॉक्टरांना दाखविल्या होत्या. डॉक्टरांनी त्या जखमा लिहून घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी डॉक्टरांना असे सांगितले नाही की, मला कोणी आणि कशाने मारहाण केली. हे मला सांगता येणार नाही की, मला मारहाण केलयाबाबतचा मजकूर डॉक्टरांनी लिहून घेतला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, मला आटपाडी येथील डॉक्टरांनी सिव्हील हॉस्पीटल सांगली येथे रेफर केले. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याप्रमाणे सिव्हील हॉस्पीटल सांगली येथे गेलो. मला सिव्हील हॉस्पीटल सांगली येथील डॉक्टरांनी कशाने जखमा झाल्या व कोणी केल्या याबाबत विचारपूस केली नाही. मी सांगली येथील डॉक्टरांना कशाने जखम झाली आणि कोणी मारहाण केली याबाबत सांगितले होते. हे मला सांगता येणार नाही की, तसा मजकूर सांगली येथील डॉक्टरांनी लिहून घेतला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आटपाडी आणि सांगली येथील दवाखान्यात मी डॉक्टरांना आरोपीने मला काठीने मारहाण केली असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरेापीने तशी मारहाण केली नसल्यामुळे मी डॉक्टरांना तसे सांगितले नव्हते.

१५. हे म्हणणे खरे आहे की, सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे विश्रामबाग पोलीस स्टेशनचे पोलीस असतात. हे म्हणणे खरे आहे की, मी दुस–या दिवशी सकाळी आटपाडी येथे आलो. साक्षीदार सांगतात की, संध्याकाळी आटपाडी येथे आलो. मी दुस–या दिवशी दुपारनंतर आटपाडी येथे आलो. हे म्हणणे खरे आहे की, मी आटपाडीत

आल्यानंतर पोलीस स्टेशनला गेलो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलीस स्टेशनला जाताना माझ्यासोबत विलास नाना शिंदे हे होते. मी पोलीस स्टेशनला आल्यानंतर दोन ठिकाणी माझ्या सह्या केल्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला मी सह्या केल्यानंतर माझा पोलीसांशी संबंध आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनला आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला काठी आर्टिक्कू अ ने मारहाण केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपीने मला काठीने मारहाण केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, उत्तम काशीनाथ जगदाळे यांनी येवून भांडण सोडविले असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, 'आरोपी दगड काढत होते' असे माझ्या जबाबात खोटे नमुद केले आहे.

१६. मी फिर्याद देताना पोलीसांना असे सांगितले होते की, 'लाल काठीने मारहाण केली', 'मी सांगली येथील दवाखान्यातून परत आल्यानंतर आरोपीले मला अशी धमकी दिली की, तु आटपाडी पोलीस स्टेशन येथे माझ्याविरुध्द तक्रार दिलीस तुला आता जिवंत सोडणार नाही', 'मी माझ्या शेतामध्ये तीस–चाळीस नारळाची झाडे आणि वीस–पंचवीस आंब्याची झाडे लावली होती', या सदर बाबी माझ्या फिर्यादमध्ये नमुद नसण्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त काठी आर्टिकल अ– काठी मी पोलसांना जप्त करण्यासाठी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आणि आरोपीच्या वाकडेपणातून मी आरेापीविरुध्द न घडलेल्या घटनेबाबत खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा सांगितला आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही. श्रवणोत्तर स्विकृती,

सही/-
दि. १३/०१/२०२५ (आर. बी. कुलकर्णी)
आटपाडी. सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी